Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 07 February 2025

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०७ फेब्रुवारी २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- राष्ट्र प्रथम हे आपल्या सरकारच्या विकासाचं मॉडेल – पंतप्रधानांचं प्रतिपादन
- संरक्षण उत्पादन धोरण तयार करणारं महाराष्ट्र पहिलं राज्य असल्याचं मुख्यमंत्र्यांची माहिती,संरक्षण क्षेत्रातल्या नामांकित कंपन्यांसोबत पाच सामंजस्य करार
- राज्य सरकारच्या कोणत्याही योजना बंद केल्या जाणार नसल्याची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची नांदेड इथल्या सभेत ग्वाही
- शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश

आणि

- पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारताचा इंग्लंडवर चार गडी राखून विजय

****

राष्ट्र प्रथम हे आपल्या सरकारच्या विकासाचं मॉडेल असून, ते तुष्टिकरण नाही, तर संतुष्टिकरणावर केंद्रीत असल्याचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. राज्यसभेत काल राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. या विकासाच्या मॉडेलला देशातल्या जनतेनं समर्थन दिल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं, ते म्हणाले:

***“2014 के बाद देश ने हमें सेवा करने का अवसर दिया। देश दुसरी बार, तिसरी बार हमे सेवा करने का मुहुरत बनाती है इसका कारण***

***देश की जनता ने हमारे विकास के मॉडेल को परखा है। समझा है। और समर्थन दिया है।''***

राष्ट्रपतींचं अभिभाषण भविष्यासाठी मार्गदर्शक असल्याचं पंतप्रधान म्हणाले. केंद्र सरकारने कौशल्य विकास, आर्थिक समावेशन आणि औद्योगिकीकरणावर लक्ष केंद्रित केल्याचं सांगून त्यांनी, मुद्रा योजना, गरीबांना आरक्षण, शिक्षण, रोजगार अशा अनेक मुद्यांवर भाष्य केलं.
यानंतर राज्यसभेत धन्यवाद प्रस्ताव संमत करुन कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

****

संरक्षण उत्पादन धोरण तयार करणारं महाराष्ट्र हे पहिलं राज्य असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. पुण्यात चाकण इथं काल निबे लिमिटेडच्या वर्धापन दिन सोहळ्यात निबे डिफेन्स ॲण्ड एरोस्पेस लिमिटेडच्या अत्याधुनिक क्षेपणास्त्र संकुल आणि लघु शस्त्रास्त्र निर्मिती सुविधेचं उद्घाटन तसंच शिर्डी इथल्या सुविधेचं भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र शासनानं संरक्षण क्षेत्रातल्या नामांकित कंपन्यांसोबत पाच सामंजस्य करार केले. केंद्र सरकारने देशातल्या नवोन्मेषकांना संधी, व्यासपीठ मिळवून दिल्याने आज आपला देश संरक्षण क्षेत्रात श्रेष्ठत्वाकडे वाटचाल करत असल्याचं फडणवीस म्हणाले. उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत यावेळी उपस्थित होते.
दरम्यान, पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातल्या विविध विकास कामांचं लोकार्पण आणि भूमिपूजनही काल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं. उद्योगांना त्रास होईल अशी वर्तवणूक करणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

****

राज्य सरकारने सुरू केलेल्या कोणत्याही योजना बंद केल्या जाणार नाहीत, अशी स्पष्ट ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. विधानसभा निवडणुकीनंतर मतदारांचे आणि लाडक्या बहिणींचे आभार मानण्यासाठी नांदेड इथं आयोजित जाहिर सभेत ते काल बोलत होते. मराठवाड्याची दुष्काळवाडा अशी असलेली ओळख दूर करण्यासाठी बंद पडलेल्या योजना महायुती सरकार पुन्हा सुरू करत असल्याचं शिंदे म्हणाले. मराठवाड्यासाठी ११ जलसिंचन योजनांना मंजुरी दिल्याचं

सांगून, मागच्या अडीच वर्षाच्या कार्यकाळात केलेल्या कामांची त्यांनी माहिती दिली,

> ***''अडीच वर्षाच्या मुख्यमंत्र्याच्या कारकिर्दीत रखडेलेले प्रकल्प आम्ही पुढे नेले. एकीकडे प्रकल्प उभे केले. दुसरीकडे लोकाभिमुख कल्याणकारी योजना आम्ही सुरू केल्या. लाडकी बहीण योजना, लाडका भाऊ योजना. शेतकऱ्यांचं वीजबिल माफ केलं. शेतकरी सन्मान योजना काढली. युवकांना प्रशिक्षण भत्ता दिला. वयस्करांना वयश्री योजना केली. अडीच वर्षात एवढे निर्णय घेतले, आतापर्यंतच्या इतिहासात कधीच एवढे निर्णय घेतले नाहीत.''***

दरम्यान, या सभेनंतर वार्ताहरांशी बोलताना शिंदे यांनी, समृद्धी महामार्गाप्रमाणे शक्तिपीठ मार्गाचाही विरोध मावळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली. शक्तिपीठ महामार्ग जनतेवर लादणार नाही, असं सांगतानाच त्यांनी, जिथे विरोध आहे तिथे काम केलं जाणार नसल्याचं स्पष्ट केलं.

****

शेतरस्ते बंद करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. शिव पाणंद आणि शेत रस्ते समृद्ध करण्याबाबत नागरिकांच्या सूचना मागवण्यात आल्या होत्या, त्या अनुषंगाने काल घेण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. राज्यातल्या सर्वच शिव पाणंद आणि शेतरस्त्यांची हद्द निश्चित करून त्यांची कामं दर्जेदाररीत्या पूर्ण करण्याची सूचनाही बावनकुळे यांनी दिली.

****

राज्यात अतिवृष्टी, गारपीट, पूर, दुष्काळ, या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकरी आणि अन्य घटकांना राज्य शासनाने ५९२ कोटी ३४ लाख ९० हजार रुपयांची मदत दिली असल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली. पाच लाख ३९ हजार ६०५ लाभार्थ्यांच्या बँक खात्यात ही रक्कम जमा करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. यामध्ये छत्रपती संभाजीनगर विभागात चार लाख ८३ हजार ८८३ लाभार्थींना ५१४ कोटी ८५ लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे.

****

नागपूर इथं काल झालेल्या पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारताने इंग्लंडवर चार गडी राखून विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करत इंग्लंडच्या संघाने दिलेलं २४९ धावांचं लक्ष्य, भारताने ३९ व्या षटकात सहा गडी गमावत पूर्ण केलं. शुभमन गील ने ८७, श्रेयस अय्यरने ५९ धावा केल्या. मालिकेतला दुसरा सामना परवा नऊ तारखेला ओडिशात कटक इथं होणार आहे.

****

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये तीरंदाजीच्या रिकर्व्ह प्रकारात काल महाराष्ट्राच्या शुकमणी बाबरेकर आणि गाथा खडके यांनी मिश्र गटातलं विजेतेपद पटकावलं. तर महाराष्ट्राच्या महिला तिरंदाजांच्या पथकाने सामूहिक रिकर्व्ह प्रकारात बाजी मारली आहे. या स्पर्धेत महाराष्ट्र १९ सुवर्ण, ३६ रौप्य आणि ३३ कास्यपदकांसह एकूण ८८ पदकं जिंकून तिसऱ्या स्थानावर आहे.

****

ज्येष्ठ क्रीडा आणि चित्रपट समीक्षक, लेखक द्वारकानाथ संझगिरी यांच्या पार्थिवावर आज दादर इथल्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. संझगिरी यांचं काल प्रदीर्घ आजारानं निधन झालं, ते ७४ वर्षांचे होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, क्रिडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी संझगिरी यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

****

धाराशिव इथं महाराष्ट्र जीवनोन्नती अभियान अर्थात उमेद अभियानाच्या महिलांनी उत्पादित केलेल्या महिला बचत गट उत्पादित वस्तूंच्या प्रदर्शनाचं उद्घाटन काल पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून झालं. महिला बचत गटाच्या माध्यमातून जिल्ह्यातल्या महिलांनी आपली प्रगती करून आत्मनिर्भर व्हावं, असं आवाहन पालकमंत्र्यांनी यावेळी केलं. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष यावेळी उपस्थित होते. या प्रदर्शनाबद्दल माहिती देताना ते म्हणाले:

> ***‘‘आमच्याकडे याठिकाणी आज दीडशे स्टॉल्स उपलब्ध आहेत. आणि फक्त धाराशिव जिल्ह्यातलं नाही तर बाहेरच्या जिल्ह्यातील पण जवळजवळ पंधरा स्टॉल्स येऊन याठिकाणी सहभागी झालेले आहेत. आमचं टार्गेट जवळपास वीस लाख आहे. पण आमची एक्सपेक्टेशन आहे की वीस लाखाच्या पलिकडे जाऊन जवळपास यावेळेस पंचवीस लाख या वेळेस आम्ही रीच करू.’’***

यावेळी उमेद अभियानाच्या उपक्रमांना इलेक्ट्रॉनिक्स मीडियातून व्यापक प्रसिद्धी दिल्याबद्दलचा २०२०-२१ चा राजमाता जिजाऊ स्वावलंबन इलेक्ट्रॉनिक्स मीडिया उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार आकाशवाणी, दूरदर्शनचे वार्ताहर देविदास पाठक यांना प्रदान करण्यात आला. तसंच उत्कृष्ट काम करणाऱ्या महिला बचत गटांना देखील राजमाता जिजाऊ स्वावलंबन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं.

****

नांदेड जिल्ह्यातल्या भोकर शहरात दहा ते २३ फेब्रुवारी दरम्यान हत्तीरोग दुरीकरण सार्वत्रिक औषधोपचार मोहीम राबवण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने काल भोकर इथल्या ग्रामीण रुग्णालयात झालेल्या डॉक्टर, परिचारिका, अंगणवाडी कर्मचार्यांच्या प्रशिक्षण सत्रात वैद्यकीय अधिक्षक डॉ. प्रताप चव्हाण यांनी मार्गदर्शन केलं. या मोहिमेअंतर्गत डी.ई.सी आणि अल्बेडाँझॉल गोळया देण्यात येणार आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात आरोग्य विभागामार्फत पूर्वलिंग निदान प्रतिबंध - पीसीपीएनडीटी आणि वैद्यकीय गर्भपात - एमटीपी कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी केली जात आहे. लिंग समानता आणि जनजागृतीसाठी विशेष उपक्रम राबवले जात असून, नागरिकांनी यासाठी पुढाकार घेऊन लिंग समानता आणि स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंधासाठी आपलं योगदान द्यावं, असं आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक तथा जिल्हा समुचित प्राधिकारी डॉ. धनंजय चाकूरकर यांनी केलं आहे.

****

परभणी जिल्ह्यातल्या धार्मापुरी इथल्या ज्ञानसाधना कॉलेज ऑफ फार्मसी आणि उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने रस्ता सुरक्षा आणि वाहतुकीचे नियम याबाबत काल कार्यशाळा घेण्यात आली. सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी आशिष पराशर यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं.

****

पैठण इथल्या नाथसागर धरणाच्या पायथ्याशी असलेल्या जुने कावसान इथल्या गोदावरी नदीत अवैध वाळू उत्खनन करणार्यांवर पोलिसांनी कारवाई केली. अप्पर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे यांच्या पथकाने मध्यरात्रीच्या दरम्यान याठिकाणी छापा मारुन हायवा, यारी मशीन, लोडर जप्त केलं.

****